**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३ दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# ***प्रेसनोट***

## पोलीस असल्याची बतावणी करून जबरी चोरी करणारे तसेच इंडस्ट्रीयल कंपनीमध्ये पार्टची चोरी करणारी टोळी जेरबंद, ५ लाख ३३ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची उल्लेखनिय कामगिरी

दि.२९/०६/२०२३ रोजी गुन्हे शाखा, युनिट १ चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट १ कडील पोलीस अंमलदार बाळु कोकाटे, सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, अजित रूपनवर असे पोलीस पथक चिंखली पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या घरफोडी चोरीच्या गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना पथकास माहिती मिळाली की, चार इसम चोरीचा माल घेवुन जाधववाडी थांबले आहेत. अशा मिळाले माहिती वरून पोलीस पथकाने पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे सुचना प्रमाणे जाधववाडी, राम मंदिर मैदान परीसरामध्ये सापळा लावुन इसम नामे १) मंगेश युवराज कदम, वय २१ वर्षे, रा.से.नं.४, लांडगेवस्ती, अनिल फुगे यांचे रूममध्ये, भोसरी, पुणे २) अनिकेत उर्फ अनिल कैलास कदम, वय २३ वर्षे, रा.झपकेचाळ, ओमसाई किराणा स्टोअर्स जावळ, लांडगेवस्ती, भोसरी, पुणे ३) समीर मंहमद रफीक इनामदार, वय २२ वर्षे, रा.शिंदे निवास, अंजलीनगर, गल्ली क्रमांक ३, कात्रज, पुणे, ४) अभिजीत धनाजी खाडे, वय २१ वर्षे, रा.गणेश मंदिराचे समोर, भगतवस्ती, भोसरी, पुणे यांना पकडले. तेव्हा त्यांच्या ताब्यात मध्ये <u>एक रिक्षा, रिक्षामध्ये महिंद्रा कंपनीचे गेअरचे १४४ जॉब, दोन दुचाकी मोटार सायकली, मोबाईल व एक आधार कार्ड, ड्रायव्हींग लायसंन्स, एटीएम कार्ड असा एकुण ०५ लाख ३३ हजार रूपयांचा</u> मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला.

आरोपी यांचेकडुन जप्त करण्यात आलेल्या मालाबाबत अधिक सखोल तपास करता त्यांचे ताब्यात मिळुन आलेल्या महिंद्रा कंपनीचे गेअरचे १२ कॅरेट मधील १४४ जॉब चोरी बाबत <u>**चिखली पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ४१२/२०२३ भादवि कलम ३८०**</u> अन्वये गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले आहे.

तसेच आरोपी यांचे जवळ मिळुन आलेल्या मोबाईल व एक आधार कार्ड,ड्रायव्हींग लायसन्स, डेबिट कार्ड बाबत सखोल तपास करता आरोपी यांनी कुदळवाडी परीसरामध्ये एका इसमास पोलीस असल्याचे

सांगुन त्यास दमदाटी करून जबरदस्तीने चोरी करून नेले होते. त्याबाबत **चिखली पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ४१३ /२०२३ भादवि कलम ३९२,१७०,१७१,३४** अन्वये गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले आहे. आरोपी यांना पुढील कारवाई कामी चिंखली पोलीस ठाणे कडे वर्ग करण्यात आले आहे.

आरोपी समीर मंहमद रफीक इनामदार याचे विरूध्द  राजगुरूनगर पोलीस ठाणे, गु.र.नं.१७७/२०१६ भादवि कलम ३०२ प्रमाणे पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यामध्ये तो जामीनावर आहे. तसेच आरोपी नामे मंगेश युवराज कदम याचे विरूध्द भोसरी पोलीस ठाणे गु.र.नं.५००/२०२३ भादवि कलम ३८०,४५७,३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यामध्ये तो जामीनावर आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त संजय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पाटील,पोलीस अमंलदार शिवाजी कानडे,बाळासाहेब कोकाटे, सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, मनोजकुमार कमले,फारुक मुल्ला, अमित खानविलकर, गणेश महाडिक, सचिन मोरे, उमाकांत सरवदे, प्रमोद हिरळकार, अजित रूपनवर, प्रमोद गर्जे, विशाल भोईर, मारोती जायभाये, तानाजी पानसरे,स्वप्नील महाले,तांत्रिक विश्लेषक नागेश माळी,पोपट हुलगे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा)
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,पुणे